# दस्त

**नारायण धारप**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**दस्त : नारायण धारप**

© सुरक्षित

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये १७०/-

# एक

मजल-दर-मजल करीत शेवटी तो लिफाफा दत्तूच्या हातात पडला होता. तो लिफाफा उघडल्यानंतर त्या आधीच्या क्षणाचा दत्तू कायमचा नाहीसा होणार होता. त्यासाठी त्याचं नाममात्र त्रोटक वर्णन आवश्यक, उद्‌बोधक, कदाचित मनोरंजक ठरेल. दत्तूची उंची सरासरीपेक्षा कमीच होती. शरीराला बोजडपणा होता, वर्ण काळ्यावर झुकणारा होता, केसांना एव्हानाच विरळपणा यायला लागला होता. वय तिशीपेक्षा चाळीशीलाच जवळचं होतं. आतापर्यंतच्या सर्व वर्षांची गोळाबेरीज -शून्य. या निरर्थक प्रवासात वाटेवर कोठेतरी तो आपल्या आई-वडिलांना हरवून बसला होता. शिक्षण कोठेतरी अर्धवटच थांबलं होतं. शिक्षण नाही, रूप नाही, पैसे नाहीस... बुद्धिमत्ता असली तर ती आत कोठेतरी दडली होती... अशांचा सामाजिक प्रवास खडतरच होणार. त्यांना मित्रही मिळणार नाहीत. चाहते तर दूरच राहिले. व्यवहारातल्या इतर सर्व गोष्टींसारखं स्त्रीसुखही विकतच घ्यावं लागणार... जवळ दाम असला तर... असा हा जीवनाच्या कडेकडेवर, एकट्या एकट्याने, रखडत चाललेला दत्तू... त्याच्या हातात तो लिफाफा पडला.

जबडे नावाच्या कोणा सॉलिसिटरकडून तो पाठवला गेला होता. आत एकच जाड कागद होता. रा. दत्तात्रय भगवान केतकर (दत्तूला काही वेळानंतर उमगलं की हे त्याचंच नाव होतं!) याना उद्देशून ते पत्र होतं.

''*मौजे, शिवपूर, जि. बुलढाणा येथील स्थायिक जमीनदार आणि आमचे अशील कै. गोविंदराव दस्त यांचा गेल्या महिन्यात २२ तारखेस आकस्मिक देहांत झाला. त्यांच्या मृत्युपत्रान्वये त्यांच्या भगिनी कै. सावित्री यांचे तुम्ही नातू आहात आणि तुम्ही त्यांच्या स्थावर-जंगम सर्व मालमत्तेचे वारस आहात. हे पत्र तुमच्या हातात पडल्यानंतर सवडीने, पण शक्यतो लवकर आपल्याजवळील जन्माचा दाखला, अगर*

*परीक्षेचे सर्टिफिकीट अगर इतर कोणताही उपलब्ध पुरावा घेऊन आम्हास वरील पत्त्यावर भेटावे. शक्यतो आधी पत्र टाकल्यास उत्तम! एक उपदेशवजा सूचना. कै.दस्त यांची सर्व मालमत्ता दहा लाखाचे वर आहे. अशा मोठ्या रकमा हाताळायची सर्वसामान्यांना सवय नसते. क्वचित प्रसंगी हितचिंतकाच्या बुरख्याखाली काही मतलबी लोकांकडून फसवणूक होण्याची शक्यता असते. तेव्हा कृपया या पत्राची गोष्ट शक्यतो खाजगीतच ठेवावी. पैशासंबंधात कोणाशीही कसलेही व्यवहार वा कागदपत्रे करू नयेत. मिळकतीच्या कारभारासाठी आम्ही सदैव मदतीस तयार आहोतच.*

आपले इ. इ...''

दत्तू ते पत्र हातात धरून कितीतरी वेळ त्याच्या घडीच्या कॉटवर बसला होता. कोण हे गोविंदराव दस्त! त्याने त्याच्या आजवरच्या आयुष्यात त्यांचं नावही ऐकलं नव्हतं. त्यांनी त्याला लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी लक्षाधीश केलं होतं. दहा लाख रुपये, ते जबडे लिहीत होते. दहा लाख! पाचशे रुपयेसुद्धा त्याने क्वचितच हाताळले होते. आणि तेही दुसऱ्यांचे! दहा लाख रुपये! आता त्याला काय अशक्य होतं? अगदी स्पेशलातल्या स्पेशल जेवणाला किती पडतील? पन्नास रुपये! त्या उत्तमातल्या उत्तम सुटला लेबल होतं –बाराशे रुपये! त्याला अशक्य होतं? एकदा कोठल्यातरी समुद्राच्या काठी पोहत असताना अचानक एक मोठी लाट त्याच्यावर येऊन कोसळली होती... वास पुन्हा छातीत भरेपर्यंत त्याला कासावीस व्हायला झालं होतं... तशीच ही भरतीची लाट आता त्याच्यावर येऊन आदळली होती... आतापर्यंतची फुकट गेलेली ज्वानीची वर्षं.. आता एकाएकी समोर उलगडलेला डोळे दीपवणारा मोहक देखावा... क्षणभर खरोखरच तो कासावीस झाला... त्याने डोळे घट्ट मिटून घेतले. डोकं दोन्ही हातांनी घट्ट धरलं... त्याच्या डोळ्यांना पाणी आलं होतं...

हा आवेग काही मिनिटात ओसरला. त्याने डोळे पुसले तेव्हा त्याच्या चेहऱ्यांवर एक क्षीणसर हास्य होतं. अजून सर्व काही कागदोपत्रीच होतं. हे सर्व एखाद्या मृगजळासारखंच मायावी नसेल कशावरून? आतापासून शेखमहंमदी स्वप्नं कशासाठी? पण तरीही तो उभा राहिला तेव्हा त्याच्या खांद्यांना एक नवी उभारी होती.

✦✦✦

# दोन

जबडे सॉलिसिटरचं ऑफिस त्यांच्याच स्वत:च्या वाड्यात, पुढच्या भागातल्या दिवाणखान्यात होतं. ओसरीवरच्या डेस्कपाशी एक होतकरू तरुण बसला होता. दत्तूचं नाव आत सांगताच स्वत: जबडेच घाईघाईने बाहेर आले. कृष्णवर्णी, स्थूल शरीर, नाकावरचा घसरणारा जाड भिंगांचा चष्मा, वर्णाला न शोभणाऱ्या गडद रंगाचा मॅनिला, ढगळ पँट... पण तल्लख, हिशेबी नजर.

''या... या... दत्तोपंत... या आत!'' ते अगत्याने म्हणाले. ऑफिस पेशवाई थाटाचं होतं. खाली जाजम, एका अंगास कोच, खुर्च्या. एका अंगास जराशी मळकट गादी, लोड-तक्के. गादीवर पानदान. भिंतीपाशी त्यांचं मोठं टेबल होतं. टेबलासमोरच्या खुर्चीतच दत्तू अंग चोरून बसला होता. त्याला आजवर कोणी 'दत्तोपंत' हाक मारली नव्हती, की खुर्ची दिली नव्हती. तो आता स्व:च्या हाताकडे पाहात बसून होता. जबड्यांनी काही वेळ त्याचं निरीक्षण केलं आणि मग घसा साफ करून ते म्हणाले, ''दत्तोपंत, मला माहीत आहे हे सर्व तुम्हाला नवीन आहे, पण आता त्याची सवय करून घ्यायला हवी. तुमच्या हातात माझं पत्र पडलं त्याक्षणी तुमचा पुनर्जन्म झाला. आता मागचे सर्व काही विसरा. आता तुम्ही समाजातले एक मालदार व प्रतिष्ठित असामी झाला आहात.''

दत्तू मळकट पिशवीतून त्याची जुनी, हाताळलेली कागदपत्रं काढू लागला. ''त्यांची जरूरी नाही'' जबडे म्हणाले, ''तुमच्या आजोबांजवळ तुमची सर्व माहिती होती. एक फोटोही होती. गेली कितीतरी वर्षं त्यांची कामं मी करीत आहे. त्यांना इतरही बरेच नातेवाईक आहेत. तुमचीच निवड त्यांनी का केली हे मलाही कोडंच आहे... यात तुम्ही स्वत:चा अपमान समजू नका बरं का! पण तुम्ही नशीबवान खरे! आजोबांनी कागदोपत्री एकही उणीव ठेवलेली नाही. खऱ्या अर्थाने निर्वेध वारसा!''

दत्तू केवळ मान हलवत होता. जबडे खुर्चीवरून उठून त्याच्याजवळ आले, त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाले, ''दत्तोपंत, तुम्ही अगदी गोंधळून गेला असाल... त्यात तुमचा काहीच दोष नाही... सारंच अनपेक्षित आहे. सध्यातरी तुम्ही सर्व माझ्यावर सोपवा. आज तुम्ही माझ्याकडेच मुक्काम करा. संध्याकाळी आपण थोडी खरेदी करू. उद्या सकाळी मीच तुमच्याबरोबर येतो, तुम्हाला तुमच्या वाड्यावर पोहोचवतो... या आत.''

आत जुना वाडा, मागच्या अंगणात विहीर, तिथेच स्नानाचा आडोसा. गरम पाण्याने सचैल स्नान. सुग्रास भोजन. मग निवांत झोप. जबडे संध्याकाळी त्याला बाजारात घेऊन गेले.

त्याच्यासाठी त्यांनी मॅनिले, पँट, सँडल, अंडरवेअर, टॉवेल, नॅपकिन, दाढीचे सामान, टॉर्च, बिस्किटे, केक, फरसाण, खाकरे, चटण्या, लोणची... कितीतरी खरेदी केली. दोन ट्रंका घेतल्या.

''तुमच्या आजोबांच्या कामात मला खूप प्राप्ती झाली आहे.'' बिल देत ते म्हणाले, ''आजोबा पैशांची कधीही कसूर करीत नसत. तुमच्या वरखर्चासाठीही त्यांनी बरीच रोख रक्कम ठेवलेली आहे. तुम्ही कसलाही संकोच करू नका.''

दुसऱ्या दिवशी सकाळी सातच्या एस.टी.ने ते निघाले. नऊच्या सुमारास त्यांचा स्टॉप आला. स्टॉपवरच टांगा ठरवून दोन-अडीच मैलांवरच्या गावात ते तासाभरात पोहोचले. जबड्यांना ओळखणारे अनेक लोक दिसत होते. टांगा पंचायत कचेरी, चौकी, बाजार ओलांडत शेवटी वाड्यापाशी थांबला. वावभर जाडीच्या, हिरवट शेवाळाने माखलेल्या, चिरेबंदी दगडांच्या भिंतीमध्ये पुरुषभर उंचीचा, पितळी अणकुचीदार खिळे मारलेला अजस्र दरवाजा. जबड्यांनी साखळदंडाचा आवाज केला होता. पाच-सात मिनिटांनी दिंडीदरवाजा करकरत आत उघडला. आत वाड्याइतकाच पुरातन वाटणारा सुरकुतलेल्या चेहऱ्याचा म्हातारा गडी होता. दिंडीदरवाजातून वाकून आत जाऊन जबडे आत उभे राहिले.

''या... दत्तोपंत या. हा तुमच्या जहागिरीचा वाडा.'' त्या गड्याकडे वळून, ''जखोबा, हे वाड्याचे नवे मालक दत्तोपंत.'' जखोबा वाळक्या हातानी दत्तूला नमस्कार केला. ''निरोप पोचला ना रे? सगळी तयारी आहे ना?''

''होय मालक.'' जुन्या खरखरत्या आवाजात जखोबा बोलला.

जबडे दिवसभर वाड्यावर राहिले. दत्तूला त्यांनी वाडा बळदापासून ते गच्चीपर्यंत

प्रत्येक खोलीत नेऊन दाखवला. कोठीघर, देवघर, चांदीची भांडी, इतर किमती वस्तू ठेवलेली खोली, पाहुण्यांसाठीच्या खोल्या, त्याच्या आजोबांची खोली, स्वयंपाकघर, जेवणघर व मागच्या-पुढच्या ओसऱ्या. संध्याकाळी किल्ल्यांचा भला मोठी जुडगा त्याच्या हाती देत ते म्हणाले, ''दत्तोपंत, मी जातो. आतापुरता वाड्यावर आराम करा. पाच-सात दिवसांनी मला ऑफिसात भेटायला या. तुम्हाला आणखी खूप गोष्टींची माहिती करून घ्यावी लागेल. एक सूचना, इतरत्र सर्वत्र तसंच इथेही गावकी आहेच. जुनी वैरं आहेत. कोर्ट कज्जे चालू आहेत. वाटणीवरून, वारसावरून, जमिनीवरून तंटेबखेडे आहेत. तुमचे आजोबा सर्वांच्यात मिसळून स्वत: अलिप्त राहिले होते. तुम्हीही तेच करा. सर्वांशी बोलावं, चहापाणी द्यावं-घ्यावं, सर्वांचं ऐकून घ्यावं... मात्र कान हलका नसावा. कोणाशीही कशाचाही वायदा करू नये. ठीक आहे, मी जातो.''

तो वाड्याच्या दारापर्यंत त्यांना पोहोचवायला आला होता. त्याचा पुन्हा एकदा निरोप घेऊन ते वळले, स्थूल शरीर सावरत रस्त्याला लागले.

दाराला कडी घालून तो आत आला.

✦✦✦

# तीन

तो येऊन ओसरीवरच बसला. जखोबाने तीन-चार कंदील, दोन उभे स्टँड, दोन-तीन चिमण्या साफ करायला घेतल्या होत्या. रॉकेलचे दिवे, म्हणजे वीज नाही, रेडिओ नाही, पंखे नाहीत. (लक्षाधीशाच्या घरात या सर्व वस्तू हव्यात, नाही का?) आजोबांना त्यांची कधी गरज भासली, नाही का? एकाएकी त्याला उमगलं-या उपकारकर्त्या आजोबांविषयी त्याला कणभराचीसुद्धा माहिती नव्हती. ते कसे दिसत होते, त्यांचं वय काय होतं, आवडीनिवडी काय होत्या, स्वभाव कसा होता, दिवसभर काय व्यवसाय-उद्योग करीत असत, त्यांची अखेर कशाने झाली होती, त्यांचे आणखी कोणी नातेवाईक होते का, वाड्यात भेटायला येत असत का,... त्याला स्वत:च्या मनासमोर उलगडत जाणाऱ्या या न संपणाऱ्या प्रश्नमालिकेचं स्वत:लाच हसू आलं.

''जखोबा !''

''जी मालक !''

''दिवे लावून झाले की इकडे ये, मला तुझ्याशी बोलायचं आहे.'' ''जी मालक.''

दत्तूच्या डोळ्यासामोर चित्र उभं राहिलं ते असं होतं. (ते एक बैठकीत झालं नाही. सरळ प्रश्नाला सरळ उत्तर देण्याचा जखोबाचा स्वभावच नव्हता) आजोबांचं वय ऐंशीच्या आसपास नक्कीच होतं. शरीरयष्टी गोरीपान, उंच व सुदृढ होती. आवाज पहाडी होता. आवडते छंद म्हणजे वाचन आणि वेळीअवेळी रानावनातून फिरणं. त्यांना चोराचिलटाची, जनावराची, किरडाची कधी भीती म्हणून वाटायची नाही. जखोबा युद्धाच्या आधीपासून, म्हणजे जवळजवळ पन्नास वर्षं त्यांच्याकडे नोकरीला होता.आजोबांनीच त्याला स्वंयपाक करायला शिकवलं होतं. वाड्यात ते दोघेच असायचे. गोविंदरावांना इतर लोक फार बिचकून म्हणत असत. त्यांचा बुलंद आवाज. त्यांची धारदार नजर. पण जखोबा आपल्या कामात दंग असायचा. घड्याळासारखी

नियमित कामं. सकाळ-संध्याकाळ वाडा वरपासून पार खालपर्यंत झाडून काढायचा. विहिरीचे पाणी भरून ठेवायचं, सामानावरून फडकं मारायचं, मागच्या चौकातल्या झाडांना पाणी घालायचं, मग सकाळ-संध्याकाळाचा स्वयंपाक, दुपारी बाराला बाजारहाट, पुन्हा कोणी आलं गेलं तर दार उघडायचं-लावायचं. मालकांकडे कोण येतं, कोण जातं, जखोबाला त्याच्याशी काय करायचं होतं? त्याला काय माहीत कोण नात्यागोत्यातलं? आणि वाड्यात जायला यायला ही काय एकच वाट होती का? मागचा दरवाजा होता की ! पण त्याची किल्ली फक्त मालकांकडे! रात्री-अपरात्री दाराच्या करकरण्याचे आवाज आले, हलक्या आवाजातली बोलणी कानावर आली, आणखीही काहीबाही कानावर आलं-जखोबाला त्यात नाक खुपसायची काय जरुरी?

काही वेळाने दत्तूच्या ध्यानात आलं की, अशा तिरकस बोलण्यातून जखोबा त्याला हवी ती माहिती देत होता. मग दत्तू जखोबाचा प्रत्येक शब्द ध्यान देऊन ऐकू लागला. तेव्हाच्या आणि त्यानंतरच्या अनेक प्रश्नोत्तरांतून त्याच्या डोळ्यांसमोर गोविंदाराव दस्त यांच जे चित्र उभं राहिलं. ते काही फारसं आकर्षक नव्हतं उलटपक्षी जरासं भीतिदायक होते.ते जबडे सॉलिसिटर म्हणाले होते, दस्तांच्यापाशी तुमचा फोटो होता, तुमची माहिती होती. आपल्याला संपत्तीचा वारस करण्याची त्यांची कल्पना खूप जुनी असली पाहिजे, पण का? त्याच्यात असं काय विशेष होतं? त्याच्या आईने वा आजीने या दस्तांच्यावर काही मोठे उपकार केले होते का? पण या कोणत्याच प्रश्नांची उत्तरं घाईने मिळणार नव्हती. अधीरपणा उपयोगी नव्हता. दत्तूच्या नकळत तो यशाच्या मार्गावरचं पहिलं पाऊल टाकत होता.

जबड्यांचा सल्ला घेऊन त्याने वाड्यात आराम केला. आजोबांच्या कृत्यामागे कारण कोणतंही असो, तो वाड्याचा निर्विवाद मालक झाला होता. पावलापावलागणिक ही मालकीची जाणीव मनात होती. खालच्या मजल्यावरच्या खोल्या वगळता वरच्या एकूण एक खोल्या रिकाम्या, बिनवापरातल्या होत्या. सफाईदार सनल्याची, मोठमोठ्या दाराखिडक्यांची, उंच तक्तपोशींची, दालनंच्या दालनं रिकामी होती. केवळ जखोबा होता म्हणून तिथे धूळ-कचरा-कोळीष्टकं नव्हती. त्यानंतर दत्तूने पुन्हा वरच्या मजल्यावर पाऊल टाकलं नाही.

मागच्या चौकातल्या डावीकडच्या सलग तीन खोल्या आजोबा वापरत होते. एक येणाऱ्या-जाणारांच्या भेटीसाठी होती, एक अभ्यासिकेसारखी कामाची होती, तिसरी झोपण्यासाठी होती. मधल्या खोलीतल्या भिंतीला लागून पुस्तकांची कपाटं होती, पण त्यांच्या काचांच्या दारांना कुलपं होती. किल्ल्या शोधून काढून कपाट

उघडण्याइतपत त्याचे कुतूहल तीव्र झाले नव्हते. आजवर दत्तू वाचन-मनन-अभ्यास यांना दूरचा वळसा देत आला होता. आताही कपाटासमोर उभा राहून आतल्या जीर्णशीर्ण पुरातन पुस्तकांच्या-ग्रंथांच्याच रांगांच्या रांगा पाहात तो पुढे सरकत होता.

आजोबांची झोपण्याची खोलीही त्याने अशीच नजरेखाली घातली होती. एक उघड होते-शारीरिक आरामाला वा छानछोकीला त्यांच्या हिशेबी किंमत नव्हती. एका साध्या लाकडी खाटेवर साधी गादी, शाल, चादर, उशी होती. पायगतच्या उघड्या कपाटात काळे-तपकिरी लांब कोट, उपरणी, धोतर, पंचे, फेटे घड्या घालून ठेवले होते. दारापाशी कोकणी वहाणांचे तीन जोड होते. खोलीत दोन आरामखुर्च्या होत्या. एक लहानसं मेज होतं, किती उघडी, साधीसुधी खोली ! असा विचार मनात येत असतानाच त्याला कोपऱ्यातलं ते दार दिसलं. उंच कपाट असावे. त्याला मात्र एक जड, जुनाट कुलूप होते.

झोपण्यासाठी ती खोली वापरण्याचा विचारही त्याच्या मनाला शिवला नाही.

✦

पुढचे पाच-सहा दिवस तो वाड्याच्या बाहेर पडलाच नाही. नवे मालक दाखल झाल्याची वर्दी गावात पोचलीही असेल. अजून गाव त्याला परके होते. कपाटांच्या किल्ल्या जखोबाच्या हातात नव्हत्या, मालक कोठे ठेवत असत त्याला माहीत नव्हतं. किल्ल्या समोर असत्या तर दत्तू कदाचित त्या पुस्तकांच्या वाटेला गेलाही नसता. त्याने ते कोपऱ्यातले कपाट उघडलंही नसतं. पण उघडता येत नाही म्हटलं की त्याखेरीज त्याच्या मनात दुसरा विचारच नव्हता. आजोबांनी या सर्व किल्ल्या का लपवल्या? कोठे लपवल्या? कोणापासून? जखोबापासून तर खास नाही! नकळत दुपारचा तो त्यांच्या झोपायच्या खोलीतल्या आरामखुर्चीत बसायला लागला होता. तिथेच बसून आढ्याकडे पाहात तो विचार करीत होता. आढ्यावर परावर्तित उन्हाचा एक कवडसा सरकत होता. मध्येच त्या उन्हात काहीतरी लख्कन चमकून उठलं… दत्तूने नीट पाहिलं… आढ्याच्या हूकला किल्ल्यांचा जुडगा टांगलेला होता! याचवेळी याच खुर्चीवर बसून तो वर पाहात होता… म्हणून त्याला तो दिसला होता!

✦

बाहेरच्या खोलीतल्या कपाटातली सर्व पुस्तके विषयाने आणि वजनानेही जड होती. काहीकाहीतर जाड फळ्यात बांधलेल्या पोथ्या होत्या. ना धार्मिक, ना तात्त्विक… वेगळ्याच आडवळणी रस्त्याची. ते लोक, ते मंत्र, त्या आकृत्या… दत्तूला आता प्रथमच शंका आली की त्याचे आजोबा साधे असामी अजिबात नव्हते. सर्व